**AW–380**

## B.A. Part—II (Semester—IV) Examination

## (Compulsory Language)

## MARATHI

वेळ : तीन तास] [गुण : 80

**सूचना:—** बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहीत धराल्या जातील.

1. 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधातून व्यक्त केलेल्या मतांचा मागोवा घ्या. 16

**किंवा**

विज्ञानाकडे डोळेझाक करुन चालणार नाही, त्याचप्रमाणे विज्ञानाच्या सामर्थ्याने आपले डोळे दिपवून घेणेही धोक्याचे ठरेल, असे डॉ. जयंत नारळीकर का म्हणतात ?

2. गाडगेबाबांच्या विचार व कार्याची महती प्रबोधनकार ठाकरे यांच्या पाठाच्या आधारे विशद करा. 16

**किंवा**

'स्त्रीवाद म्हणजे स्त्रीमुक्तीवाद नाही' या विधानाची चर्चा विद्युत भागवत यांच्या पाठाच्या आधारे घ्या.

3. (अ) मानवी जीवनामध्ये येत असलेली उद्विग्नता 'सारेच दीप कसे मंदावले आता' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा. 8

**किंवा**

राष्ट्रीय एकात्मतेचा विचार 'पेखू नका देश' या कवितेच्या आधारे पटवून द्या.

(ब) 'माती' या कवितेतून व्यक्त झालेला श्रमिकांच्या सुराज्याचा आशावाद स्पष्ट करा. 8

**किंवा**

'जागजागी' या कवितेतून जाणवणारा व्यवस्थेचा फोलपणा सविस्तर लिहा.

4. (अ) माहितीपत्रकांचे वर्गिकरण स्पष्ट करुन, माहितीपत्रकातील रचनेचे मुद्दे सविस्तर लिहा. 8

**किंवा**

माहितीपत्रक आणि जाहिरात यातील फरक स्पष्ट करुन; माहितीपत्रकाचे लेखन कसे करावे, स्पष्ट करा.

(ब) निमंत्रणपत्रिकेचे स्वरूप स्पष्ट करुन; निमंत्रणपत्रिकेचा हेतू, आणि उद्देश सविस्तर लिहा. 8

**किंवा**

निमंत्रण पत्रिकेचा हेतू स्पष्ट करुन; निमंत्रण पत्रिकेची भाषा कशी असावी. सविस्तर लिहा.

5. बहुपर्यायी प्रश्न सोडवा :

(1) मरावं तर _____ नि जगावं तर गरिबानं. 1

(अ) गरीबीनं (ब) श्रीमंतानं

(क) दारिद्र्यानं (ड) कुत्र्यानं

(2) स्त्रीपुरुषांमधील सत्तासंबंधाची राजकीय जाणीव म्हणजे ______ . 1

(अ) स्त्रीवाद (ब) पुरुषसत्ता

(क) राजकारण (ड) स्त्रीमुक्ती

(3) विज्ञानाची घोडदौड आणि तिचा समाजावर होणारा वाढता परिणाम ही _____ लक्षणे मानली जातात. 1

(अ) अणुशक्तीची (ब) तंत्रज्ञानाची

(क) ऊर्जेची (ड) विज्ञानयुगाची

(4) तन्याचा जाय ______ , मग तो सहजच होय आरसा. 1

(अ) धुका (ब) कोळसा

(क) बुरसा (ड) पिठसा

(5) 'गाडगेबाबांच्या कीर्तनातले तत्त्वज्ञान' हा लेख कोणी लिहला ? 1

(अ) बालासाहेब ठाकरे (ब) प्रबोधनकार के.सी. ठाकरे

(क) अरविंद ठाकरे (ड) कुमार ठाकरे

(6) गाडगेबाबांच्या मते देव ______ शिवाय कशाचाही भुकेला नाही. 1

(अ) भक्ती (ब) मुक्ती

(क) युक्ती (ड) शक्ती

(7) भीमाच्या लेकीचे नाव ______ आहे. 1

(अ) सविता (ब) नाबदा

(क) संपदा (ड) रुपदा

(8) तीर्थवासी गेले आणि दाढीमिशा बोडून आले।।
पाप अंतरातले नाही गेले। ______ काय केले।। 1

(अ) शरीराने (ब) बुद्धीने

(क) दाढी मिशीने (ड) पाण्याने

(9) भीमाचं गाव दूर ______ काठी होतं. 1

(अ) गंगेच्या (ब) चंद्रभागेच्या

(क) वारणेच्या (ड) पूर्णेच्या

(10) चळवळीने आम्हाला आमच्या ______ जागीव दिली. 1

(अ) स्त्रीत्त्वाची (ब) परिस्थितीची

(क) अस्तित्त्वाची (ड) पुरुषार्थाची

(11) अण्णाभाऊ साठे यांचे पूर्ण नाव : 1

(अ) लोककवी अण्णासाहेब साठे (ब) तुकाराम भाऊसाहेब साठे

(क) तुकोबा बोल्होबा आंबिले (ड) अण्णाभाऊ भाऊसाहेब साठे

(12) संत एकनाथांच्या मते दांभिक साधूचे वैराग्य ______ परि। 1

(अ) माकडाचे (ब) श्वानाचे

(क) कोल्हयाचे (ड) बोकडाचे

(13) 'जिवलगा' या कवितेतून कवयित्रीची ______ स्पष्ट होते. 1

(अ) अगतिकता (ब) निर्भयता

(क) व्याकुलता (ड) सहनशीलता

(14) प्रत्येक माणसाची काया, वाचा व मने अशी ______ झाली पाहिजे. 1

(अ) शुद्धता (ब) अवस्था

(क) विशुद्धता (ड) त्रिशुद्धी

(15) 'माती' या कवितेचे कवी कोण आहेत ? 1

(अ) राजेश महल्ले (ब) अनिल

(क) मिर्झा रफी अहमद बेग (ड) शांता शेळके

(16) स्त्रीवादी चळवळीची मांडणी व्यापक ______ पद्धतीने केली पाहिजे. 1

(अ) राष्ट्रीय (ब) पुरुषी

(क) राष्ट्रवादी (ड) भारतीय